महाराष्ट्र विधानसभा

दुसरे अधिवेशन, २०१६

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

कोल्हापूर जिल्हयात नगरोत्थान योजनेतून असलेली रस्त्यांची कामे अत्यंत निकृष्ट दर्जाची झाल्याबाबत

(१) ७११४ (०७-०४-२०१५). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.चंद्रदीप नरके (करवीर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयात नगरोत्थान योजनेतून असलेली रस्त्यांची कामे अत्यंत निकृष्ट दर्जाची झाली असून कामे करणाऱ्या ठेकेदारांनी सल्लागार कंपन्यांना न जुमानता रात्रीत स्टॉम वॉटर ड्रेनची कामे पूर्ण केल्याचे नुकतेच माहे जाने, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर येथील दानत हॉटेल रस्त्यावर कोणतीच वाहतूक होत नसतांनाही सदर रस्त्याकरिता २ कोटी २० लाख रुपये खर्च आहे काय,

(३) असल्यास, उक्त कामांसदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) तदनुसार यास जबाबदार असणाऱ्या संबंधितावर कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०६-२०१६) :(१), (२), (३), (४) व (५) जिल्हाधिकारी कोल्हापूर यांना प्रत्यक्ष चौकशी करुन अहवाल शासनास सादर करण्याबाबतच्या सूचना देण्यातआल्याआहेत.

राज्यातील महिला हिसांचार विरोधी विभागाला पुर्णवेळ पोलीस उपायुक्त नसल्याबाबत.

(२) ८०८७ (०७-०४-२०१६). श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महिलांवरील होणारे हिंसाचार रोखण्यासाठी राज्य शासनाने मार्च, २०१३ मध्ये जाहिर केलेल्या विशेष विभागाला अद्याप पूर्णवेळ पोलीस उपायुक्त नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०१५मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बलात्कार, शोषण, हुंडा आणि घरगुती हिंसाचार यासारख्या महिला अत्याचारा विरोधात जबाबदारी असलेल्या विशेष सेलमध्ये रिक्त असलेले उपायुक्त हे पद भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०६-२०१६) :(१) व (२) महिला अत्याचार प्रतिबंधक विभागामध्ये पोलीस उप आयुक्त दर्जाचे पद मंजुर नाही. यास्तव सदर पद भरण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

इचलकरंजी, जि.कोल्हापूर नगरपालिकेच्या इंदिरा गांधी मेमोरियल हॉस्पीटलमध्ये डॉक्टर्स व औषधे नसल्यामुळे रुग्णालयाची दुरावस्था झाल्याबाबत

(३) ८५३३ (०७-०४-२०१५). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.हसन मुश्रीफ (कागल) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इचलकरंजी, जि.कोल्हापूर नगरपालिकेच्या इंदिरा गांधी मेमोरियल हॉस्पीटलमध्ये डॉक्टर्स व औषधे नसल्यामुळे रुग्णालयाची दुरावस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचे रुग्णालय आधुनिकीरण व विस्तारीकरणाचा सविस्तर प्रस्ताव इचलकरंजी नगरपालिकेने शासनास दिनांक २२ जानेवारी, २०१५ रोजी अथवा त्यासुमारास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे अथवा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१६) :(१),(२) व (३) इंदिरा गांधी मेमोरियल हॉस्पीटल सुयोग्यरित्या चालविण्यासाठी ते सार्वजनिक आरोग्य विभागाकडे हस्तांतरित करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुर्तिजापूर (जि.अकोला) येथे उपविभागीय पोलीस अधिकारी नवीन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करण्याबाबत

(४) १३८९७ (०७-०४-२०१५). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुर्तिजापूर (जि.अकोला) येथे उपविभागीय पोलीस अधिकारी, नवीन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (मुर्तिजापूर) यांनी दिनांक ११ डिसेंबर, २०१४ रोजी मा.मुख्यमंत्री व मा.सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांना निवेदन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१६) :(१) होय.

(२) उप विभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, मुर्तिजापूरकरिता जागा उपलब्ध करुन प्रशासकीय इमारतीचे बांधकामासाठी निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. सदरचे बांधकाम सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई सेंट्रल-बोरिवली पाचवा रेल्वे मार्ग कामात कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी रेल्वेने राज्य शासनाकडे मदत मागूनही दुर्लक्ष होत असल्याबाबत

(५) १६७३७ (१२-०८-२०१५). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई सेंट्रल-बोरिवली पाचवा रेल्वे मार्ग वांद्रे ते खार दरम्यान असलेल्या स्थानिकांच्या विरोधामुळे सुमारे ६०० कोटी रुपये किमतीचा प्रकल्प प्रलंबित असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक विरोधामुळे कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी रेल्वेने राज्य शासनाकडे मदत मागूनही शासन दुर्लक्ष करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०५-२०१६) :(१), (२), (३) व (४) बांद्रे ते खार रोड दरम्यान ५ व्या मार्गीकेचा रु.७.२० कोटीचा रेल्वे प्रकल्प पुर्ण करण्यात आला आहे. सदर प्रकल्प तेथील स्थानिक रहिवाशांच्या विरोधामुळे कार्यरत होण्यास विलंब झाला होता. तथापि, रेल्वे प्रशासन व राज्य सरकारच्या समन्वयातुन प्रश्न सोडविण्यात आला आहे.

मुंबईतील सर्व इमारतींचे फायर ऑडिट करण्याबाबत

(६) १९६९० (१२-०८-२०१५). श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २००६ पासून मुंबईत लहान मोठ्या आगीचा तब्बल २९३९९ घटना घडल्या आणि त्यात तब्बल १८९० मुंबईकरांना प्राण गमवावा लागला आणि २२१ अग्निशमन जवान जखमी झाल्याचे केलेल्या पाहणी अहवालात माहे मे, २०१५ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई शहरातील इमारतीचे फायर ऑडिट करण्यात न आल्याने अशी प्रकरणे वारंवार घडत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रत्येक इमारतीचे वर्षातून दोनदा फायर ऑडिट करणे बंधनकारक आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबईतील फायर ऑडिट न होण्याची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०६-२०१६) :(१) मुंबई अग्निशमन दलाच्या अभिलेखानुसार, मुंबई शहरात सन २००६ पासून ऑगस्ट, २०१५ या कालावधीत आगीच्या एकूण ४६५०४ घटना घडल्या आहेत. या घटनांमध्ये ६६१९ नागरिक जखमी झाले असून २७५२ नागरिक मृत झाले आहेत. तसेच अग्निशमन दलाचे ३५४ जवान जखमी झाले असून ९ जवान मृत झाले आहेत.

(२), (३) व (४) मुंबई शहरामध्ये इमारतीचे मालक व भोगवटादार यांनी महाराष्ट्र आग व प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ अन्वये प्रत्येक वर्षाच्या जानेवारी व जुलै महिन्यांमध्ये लायसन्स प्राप्त अभिकरणाकडून इमारतींचे अग्निपरिक्षण करुन प्रमाणपत्र मुंबई अग्निशमन दलास सादर करणे सक्तीचे आहे. यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने एकूण ३७९ सरकारमान्यप्राप्त लायसन्स एजन्सींची माहिती mahafireservice.gov.in /ListOflicenseAgency या संकेतस्थळावर उपलब्ध केली आहे.

परंतु मुंबई शहरात संबंधितांकडून अत्यल्प प्रतिसाद असल्याने, बृहन्मुंबई महानगरपालिकेने पोर्टलवर माहिती प्रसारित केली आहे, भित्तीपत्रके व वृत्तपत्राव्दारे जनजागृती करावयाची कामे महापालिकेमार्फत सुरु आहेत. शिवाय अग्निशमन सप्ताहात सदर विषयी जनजागृती केली जाते. तसेच मुंबई अग्निशमन दलातील नामनिर्देशित अधिकाऱ्यांकडून इमारतींची तपासणी सुरु आहे.

मागील तीन महिन्यांत मुंबई शहरात एकूण ५०७ इमारतींची तपासणी झाली असून एका इमारतीच्या मालक व भोगवटादारांवर खटला दाखल करण्यात आला आहे.

एखाद्या इमारतीत आगीची घटना घडल्यास, त्यावेळेस इमारतीची तपासणी करुन अग्निसुरक्षा यंत्रणा कार्यान्वित नसल्यास, त्या इमारतीच्या मालक किंवा भोगवटादारावर नोटीस बजावून संबंधित इमारतीचे पाणी व वीज पुरवठा बंद करण्याबाबत संबंधितांना कळविण्यात येते.

मानखुर्द येथील महाराष्ट्र नगर परिसरातील नागरिकांना जलद मार्गावर येण्याजाण्याकरिता पादचारी पूल उभारण्याबाबत

(७) २००३२ (११-०८-२०१५). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हार्बर व शीव सीएसटी मार्गावर असलेल्या मानखुर्द येथील महाराष्ट्र नगर परिसरातील नागरिकांना जलद मार्गावर येण्या-जाण्याकरिता पादचारी पूल नसल्याने जीव मुठीत घेऊन रेल्वेमार्ग ओलांडून जावे लागत असल्याचे माहे मे, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) सदर रेल्वे मार्ग ओलांडताना मोठ्या प्रमाणात अपघात होण्याच्या घटना घडत असल्याने या फाटकावर पादचारी पूल बांधून द्यावा अशी मागणी तेथील नागरिक अनेक वर्षापासून करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीवर अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर स्थानकाजवळील नागरिकांच्या व विद्यार्थ्यांचा जीव धोक्यात येऊ नये याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०६-२०१६) :(१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही. सदर ठिकाणी पादचारी पूल बांधण्याबाबतचा प्रस्ताव महानगरपालिकेमार्फत मध्य रेल्वे प्रशासनाकडे पाठविण्यात आला होता. त्यानुसार पादचारी पुलाचे अंदाजपत्रक व नकाशे बनविण्यासाठी मध्य रेल्वे प्रशासनाने ५ लाख रुपयांची मागणी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे केली आहे. सदर रक्कम भरण्याबाबतची कार्यवाही महानगरपाकेमार्फत सुरु आहे.

(४) सदर पादचारी पूल रेल्वेच्या हद्दीत बांधण्याचे प्रसतावित असल्यामुळे हे काम रेल्वे प्रशासनामार्फत महानगरपालिकेच्या खर्चाने करण्यात येणार आहे. त्यानुसार याबाबत महानगरपालिकेमार्फत रेल्वे प्रशासनाकडे पाठपुररावा करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

बुलडाणा शहरात नगरपरिषद हद्दीत नागरी सुविधांसाठी अनेक खुले भूखंड आरक्षित असल्याबाबत

(८) २८७८५ (२१-०१-२०१६). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलडाणा शहरात नगरपरिषद हद्दीत नागरी सुविधांसाठी अनेक खुले भूखंड आरक्षित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यापैकी अनेक भूखंड लिजवर देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, खूल्या भूखंडांचा जन सुविधांसाठी वापर करण्याच्या दृष्टीने एकत्रित आराखडा तयार करण्यात आला आहे काय,
(४) असल्यास, त्यासाठी किती भूखंडांची तरतुद करण्यात आली आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१६) :(१) बुलढाणा शहरात मंजूर अभिन्यासातील एकूण ११९ भुखंड सार्वजनिक वापरासाठी खुले ठेवण्यात आले आहेत.
(२) ११९ भुखंडांपैकी २६ भुखंड सामाजिक संस्था, मंडळे यांना सामाजिक उपक्रम राबविण्यासाठी लीजवर देण्यात आले आहेत.
(३) व (४) नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

कल्याण-डोंबिवली शहराच्या (जि.ठाणे) डम्पिंग ग्राउंडमुळे शहरातील पर्यावरण रक्षण व जल प्रदुषणामुळे आवश्यक त्या पायाभूत सुविधा निर्मितीकडे नगरपालिकेचे होत असलेल्या दुर्लक्षाबाबत

(९) २८८०१ (२१-०१-२०१६). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-डोंबिवली शहराच्या (जि.ठाणे) डम्पिंग ग्राउंडच्या मुळे शहरातील पर्यावरण रक्षण व जल प्रदुषणामुळे आवश्यक त्या पायाभूत सुविधा निर्मितीकडे नगरपालिकेचे दुर्लक्ष होत असल्याने शहरातील नव्या गृह प्रकल्पांना मा. मुंबई उच्च न्यायालयाने बंदी घातली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या निदेशानुसार शहरांचा विकास हा पर्यावरण व जलप्रदूषण कायद्यान्वये केल्याशिवाय शहरी भागात नवीन गृहनिर्माण प्रकल्प राबविले जाणार नाहीत, तरी नगरपालिकेने त्या अनुषंगाने आतापर्यंत काय निर्णयात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप नगरपालिकेच्या आयुक्तांनी निर्णयात्मक कार्यवाही केली नसल्यास त्याची करणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०६-२०१६) :(१) मा.उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र.१८२/२००९ मध्ये दिनांक १३/०४/२०१५ रोजीच्या आदेशानुसार नव्या गृहप्रकल्पांना तात्पुरती बंदी घातली होती, हे खरे आहे, तथापि, मा.उच्च न्यायालयाने दिनांक २५/०४/२०१६ रोजीच्या आदेशान्वये नियमानुसार बांधकाम परवानगी प्रक्रिया सुरु करण्यास व त्यानुसार निर्णय घेण्यास परवानगी दिली आहे.

(२) नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) अधिनियम, २००० ची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचेकडे कृती आराखडा सादर करुन त्याची प्रभावी अंमलबजावणी सुरु आहे. तसेच स्वच्छ भारत अभियान (नागरी) अंतर्गत कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचा घनकचरा व्यवस्थापनाबाबतचा रुपये ११४.८३ कोटी किंमतीचा प्रकल्प शासनाने मंजूर करुन त्यासाठी केंद्र व राज्य शासनाचा मिळून एकूण रुपये १९.१४१७ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियांनातंर्गत कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने उभारलेले ११३ एमएलडी क्षमतेचे मल:शुध्दीकरण प्रकल्प सद्य:स्थिती कार्यान्वित असून डोंबिवली पश्चिम येथील ४० एमएलडी क्षमतेचा प्रकल्प प्रगतीपथावर आहे. महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत घनकचरा व्यवस्थापनासाठीची संकलन व वाहतूक व्यवस्था सक्षम करण्यात आली आहे. कोपर रोड येथे महिला बचत गटाच्या साहाय्याने "प्लास्टिक रिसायकलींग प्रकल्प" उभारण्यात आला असून तेथे दररेज एक मेट्रीक टन प्लास्टिकवर प्रक्रिया करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील बेस्टचे आधुनिकीकरण करण्याबाबत

(१०) २८८३० (२१-०१-२०१६). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील बेस्ट सध्या रुपये ५९० कोटी तोट्यात असतानाही रुपये ६७ कोटी इतक्या नफ्यात असल्याचा आकड्यांचा खेळ बेस्ट प्रशासनाने केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बेस्टला जाहिराती पोटी गेल्या दहा वर्षात रुपये ३०० कोटींचा तोटा झाल्याचे समोर आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईतील १८०० पोल ज्या कंपनीला १० वर्षासाठी प्रचारासाठी दिले आहेत त्यापेक्षा जास्त दर देणाऱ्या कंपनीला डावलण्यात आल्याचे समजते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) तसेच, मुंबईची दुसरी लाईफ लाईन समजल्या जाणाऱ्या बेस्टच्या आधुनिकीकरणासाठी शासन काही ठोस उपाययोजना करणार आहे काय,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०६-२०१६) :(१) हे खरे नाही. तथापि, काही वृत्तपत्रांमध्ये अशा आशयाच्या बातम्या प्रसिध्द झाल्या होत्या.

(२) हे खरे नाही. बेस्ट उपक्रमाला जाहिरातीपोटी गेलया १० वर्षात रु.६६० कोटी अपेक्षित होते, त्या तुलनेत बेस्ट उपक्रमाला रु.६०९ कोटी प्राप्त झाले आहेत.

(३) हे खरे नाही. बेस्ट उपक्रमातर्फे १८०० मार्गप्रकाशस्तंभावर १० वर्षाच्या कालावधीकरिता जाहिराती करण्यासाठी कोणतीही निविदा मागवून जाहिरात प्रसारणसाठी ठेका देण्यात आलेला नाही.

तथापि, सप्टेंबर, २०११ मध्ये ३२,००० मार्गप्रकाशस्तंभावर जाहिरात करण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या. या निविदा प्रक्रियेत दोन निविदाकारांनी भाग घेतला होता, त्यापैकी मे. पायोनियर संस्थेचा रु. ४५.०९ कोटी इतक्या रकमेचा देकर सर्वोच्च होता. त्यानुसार सदर निविदा मे.पायोनियर या निविदाकारास दिनांक ३ ऑक्टोंबर, २०११ ते २ ऑक्टोंबर, २०१४ या ३६ महिन्यांच्या कालावधीकरिता ३२,००० मार्गप्रकाश स्तंभावर जाहिरात प्रदर्शित करण्याकरिता निविदा देण्यात आली.

सदर निविदा प्रक्रिया पुर्णपणे पारदर्शक पध्दतीने राबविण्यात आली होती व कोणत्याही जास्त दर देणाऱ्या कंपनीला सदर निविदा प्रक्रियेत डावलण्यात आले नव्हते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) बेस्टच्या आधुनिकीकरणासाठी बेस्ट उपक्रमामार्फत खालीलप्रमाणे ठोस उपाययोजना करण्यात येत आहेत :-

* बेस्ट उपक्रमाच्या आधुनिकीकरणासाठी उपक्रमातर्फे बेस्ट बसगाड्यांच्या वेळाप्रत्रकाचे संगणकीकरण करण्यात येत आहे.
* स्मार्ट शहर प्रकल्प योजनेंतर्गत प्रवासी माहिती पध्दती प्रणालीचा अवलंब करण्यात येणार आहे.
* ब्लुमबर्ग प्रकल्पांतर्गत रस्ते सुरक्षा पुढाकार घेण्यात येत आहे.
* बेस्ट उपक्रमाच्या बस ताफ्यामध्ये अद्ययावत बसगाड्यांचा समावेश करण्यात येणार आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

बर्की (ता.शाहुवाडी जि.कोल्हापूर) या पावसाळी पर्यटनासाठी प्रसिद्ध असलेल्या गावाचा विकास करणेबाबत

(११) २९०४५ (२१-०१-२०१६). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शाहुवाडी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील बर्की गाव पावसाळी पर्यटनासाठी प्रसिद्ध आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गावी पर्यटनासोबत कृषी पर्यटनालाही चालना दिल्यास स्थानिक लोकांनाही चांगला रोजगार मिळू शकतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गावी पाच ते सहा महिने पर्यटक येण्याकरिता सदर पर्यटन स्थळाचा विकास करणेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१६) :(१) व (२) होय.
(३) व (४) पर्यटकांना धबधब्याकडे जाण्याकरीता वन विभागामार्फत तेथे दगडी पिचिंग करुन रस्ता तयार करणेत आलेला आहे. वाहनतळाची व्यवस्था करण्यात आलेली आहे.सदर वाहनतळावर देखरेख ठेवण्याकरिता स्थानिक व्यक्तिची व्यवस्था केली आहे. महिला प्रसाधानगृह बांधण्यात आलेले आहे. याची देखभाल गावातील महिलांमार्फत केली जाते. तेथे पर्यटकांना त्यांना आवडेल त्या पध्दतीने घरगुती जेवण उपलब्ध करुन दिले जाते. त्यामधून रोजगार उपलब्ध झालेला आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील पर्यटन स्थळांचा विकास करणेबाबत

(१२) २९६९७ (२१-०१-२०१६). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्ह्याला निसर्गरम्य वारसासह ऐतिहासिक आणि धार्मिक दृष्ट्या मोठी परंपरा असूनही पर्यटनाच्या दृष्टीने जिल्ह्यातील जगप्रसिध्द लोणार सरोवर, तिर्थक्षेत्र सैलानी, मौजे मढ येथील बुदणेश्वराचे पीठ, मौजे जाळीचा देव महानुभव पंथाचे श्रध्दास्थान यासह इतर अनेक स्थळे दुर्लक्षीत असून पर्यटन विकासासांठी नियोजन नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ रोजी अथवा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१६) :(१) नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

नवी मुंबई येथे चेनस्नॅचिंगच्या घटनेत सातत्याने वाढ होत असल्याबाबत

(१३) २९९०९ (२१-०१-२०१६). श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबई येथे चेनस्नॅचिंगच्या घटनेत सातत्याने वाढ होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१६) :(१) नवी मुंबई येथे चेनस्नॅचिंगच्या सन २०१४, २०१५ व २०१६ जानेवारी अखेरपर्यंत अनुक्रमे २९७, १९६ व १० गुन्हे दाखल झाले असून अनुक्रमे १७७, ११२ व १ गुन्हे उघडकीस आले आहेत.

नवी मुंबई पोलीस आयुक्त कार्यक्षेत्रात चेनस्नॅचिंगच्या गुन्ह्यांमध्ये सन २०१४ च्या तुलनेत सन २०१५ मध्ये १०१ गुन्ह्यांची घट झालेली आहे.

(२) व (३) चेन स्नॅचिंगचे गुन्हे रोखण्यसाठी नवी मुंबई येथे आत येणाऱ्या व बाहेर जाणाऱ्या मार्गावर नियमित नाकाबंदी करण्यात येते. तसेच CR मोबाईल, पेट्रोलिंग वाहने, बीट मार्शल हे सतर्कपणे पेट्रोलिंग करीत असतात. संशयित मोटार सायकल चेक केल्या जातात. दाखल झालेल्या गुन्ह्याचा सखोल तपास करण्यात येऊन गुन्हे उघडकीस आणून आरोपींना अटक करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईत साथीचे आजार पसरले असल्याबाबत

(१४) ३०१४१ (२१-०१-२०१६). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत गत अनेक दिवसांपासून पाऊसाची ये-जा होत असल्याने विविध साथीचे आजार पसरले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या साथीच्या आजारांना आळा घालण्यासाठी मुंबई महानरगपालिकेला आवश्यक प्रमाणात यश मिळत नाही हे लक्षात घेता शासनस्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, यामागील कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१६) :(१) हे खरे आहे.

(२) साथीच्या आजारांच्या प्रतिबंध व नियंत्रणासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात :-

<u>नियंत्रक कक्ष</u>

साथीच्या आजाराचे नियंत्रण व सर्वेक्षण यासाठी महापालिकेच्या आरोग्य खात्याच्या साथरोग विभागात नियंत्रण कक्ष कार्यान्वित आहे. नियंत्रण कक्षात साथ रोगांचा दैनंदिन अहवाल संकलित करण्यात येतो. या दैनंदिन अहवालाचे विभागवार विश्लेषण करुन स्थानिक पातळीवर वैद्यकीय आरोग्य अधिकारी व क्षेत्रीय कर्मचारी यांच्यामार्फत साथीच्या आजाराचे रुग्ण सापडलेल्या विभागात नियंत्रण, प्रतिबंध व इतर उपाययोजना करण्यात येतात.

<u>प्रशासकीय यंत्रणेची सज्जता</u>

पुरेसे मनुष्यबळ, साधनसामुग्री, व औषधसाठा इ. बाबत आढावा घेऊन त्यांचे सुयोग्य नियोजन करण्यात येते.

प्रशिक्षण

सर्व वैद्यकीय निम्न वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांना पावसाळ्यापूर्वी साथीच्या आजाराबाबत प्रशिक्षण देण्यात येते.

दैनंदिन सर्वेक्षण

नियमित घर भेटीद्वारे जलजन्य व किटकजन्य आजाराच्या रुग्णांचा शोध घेण्यात येतो तसेच प्रतिबंधात्मक व नियंत्रणात्मक उपचार, घ्यावयाची काळजी, धोक्याची चिन्हे व उपलब्ध सेवासुविधा याबाबत जनजागृती करण्यात येते.

निदान व उपचार व्यवस्था

साथीच्या रोगांच्या निदान व उपचाराची व्यवस्था महापालिकेच्या रुग्णालयात व दवाखान्यात उपलब्ध आहे. याबाबतची माहिती जनतेपर्यंत पोचविण्यात येते.

पाणी गुणवत्ता सर्वेक्षण

पिण्याच्या पाण्याचे दैनंदिन सर्वेक्षण करण्यात येते व दुषित पाणी आढळलेल्या विभागात जनजागृती, क्लोरीन गोळ्यांचे वाटप व बाधीत रुग्णांना औषधोपचार करण्यात येतात. तसेच जल विभागाशी समन्वय साधून दुषित पाणी पुरवठा असलेल्या विभागात तातडीची उपाययोजना करण्यात येते. तसेच, फेरीवाल्यांकडील पाण्याचे नमुने तपासून दुषित पाणी आढळलेल्या फेरीवाल्यांवर अनुज्ञापन विभागातर्फे कारवाई करण्यात येते.

एकात्मिक किटक व्यवस्थापन

किटकजन्य आजाराच्या नियंत्रणासाठी महापालिकेच्या किटक नियंत्रण विभागातर्फे डासोत्पत्ती रोखण्यासाठी विभागवार स्थानिक गरजांनुसार उपाययोजना करण्यात येतात.

आंतरविभागीय समन्व

साथरोग प्रतिबंध व नियंत्रणासाठी पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, घनकचरा व्यवस्थापन, बंदर विश्वस्त या विभागांशी समन्वय साधण्यात येतो.

आरोग्य शिक्षण

जनतेने साथरोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी कोणती खबरदारी घ्यावी तसेच साथरोगांवरील निदान व उपचाराची सुविधा कोठे उपलब्ध आहे या संदर्भातील महत्वाचे संदेश वृत्तपत्र, टी.व्ही.चॅनेल्स, रेडीओ, बसेस व रेल्वेमार्फत जाहिराती अशा विविध माध्यमातून देण्यात येतात.

या व्यतिरिक्त एच १ एन १ (स्वाईन फ्ल्यू), लेप्टो व डेंग्यु या आजारासाठी महापालिकेमार्फत खालीलप्रमाणे विशेष उपाययोजना करण्यात आल्या आहेत :-

एच १ एन १ (स्वाईन फ्ल्यू)

दुसऱ्या व तिसऱ्या तिमाहीतील गरोदर स्त्रिया तसेच अतिजोखमीच्या व्यक्ती (मधुमेह, उच्चरक्तदाब इ.) यांना असणारा एच १ एन १ चा धोका लक्षात घेता, महापालिकेमार्फत त्यांना एच १ एन १ लसीकरणाची सोय उपलब्ध केली आहे. त्यासाठी १५ लसीकरण केंद्रे, वैद्यकीय महाविद्यालये, प्रसुतीगृह व दवाखाने सुरु करण्यात आले आहेत.

लेप्टोस्पायरोसिस

लेप्टोमुळे मृत्युमुखी पावलेल्या काही रुग्णांच्या रक्ताचे नमुने पोर्ट ब्लेअर येथील विभागीय संशोधन प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आले. तसेच पशु संवर्धन खात्याचे प्रतिनिधी

व पशु वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिकारी यांच्या समन्वयाने प्राण्याच्या रक्तनमुने बंगलोर व चेन्नईस्थित प्रयोगशाळेत सर्वेक्षणासाठी पाठविण्यात आले.

सदर अहवालानुसार गुरे, घोडे, कुत्रे व उंदीर या जंतुंचे वाहक असलचे निदर्शनास आले. त्यानुसार तबेले व गोठे यांच्या मालकांना त्यांच्याकडे असणाऱ्या पाळीव प्राण्यांचे मलमुत्र निर्जंतुक करुन त्याची विल्हेवाट योग्य प्रकारे करण्यात यावी तसेच या मलमुत्राचा इतर पाण्याच्या साठ्याशी संपर्क येऊ नये याबाबतीत सूचना देण्यात आल्या.

तसेच किटक नियंत्रण विभागातर्फे लेप्टोस्पायरोसीसचे रुग्ण आढळलेल्या परिसरात मुषकविरोधी कारवाई करण्यात आली. यामध्ये पिंजरे लावून उंदीर पकडणे, विष घालून उंदिर मारणे, बिळांमध्ये वाफारणी करणे, रात्रपाळी मुषक संहारकाद्वरे उंदीर मारणे याप्रकारे उंदीर नष्ट करण्यात आले.

<u>डेंग्यु</u>

डेंग्यु आजाराच्या नियंत्रणासाठी किटक नियंत्रण विभागातर्फे डास प्रतिबंधक उपाययोजना करण्यात आल्या. यामध्ये चाही व वस्त्यांमधून डासांची उत्पत्ती स्थाने शोधून नष्ट करण्यात आली. तसेच, अडगळीचे सामान, टायर्स काढून टाकण्यात आले. डासांची उत्पत्ती थांबविण्याकरिता गृहनिर्माण संस्थांना अपिलपत्रे देण्यात आली व डास उत्पत्ती शोधकांना प्रशिक्षण देण्यात आले. तसेच त्यांच्याकडे डासांची उत्पत्ती आढळल्यामुळे मनपा अधिनियम १८८८ च्या कलम ३८१(अ) (ब) अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात आली व त्यांना ताकीद नोटीस देण्यात आली.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे येथील मुंब्रा रेतीबंदर परिसरात भरधाव ट्रकच्या धडकेत २ दुचाकीस्वार ठार आणि दोन जण जबर जखमी झाल्याबाबत

(१५) ३०४०० (२१-०१-२०१६). ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.काशिराम पावरा (शिरपूर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील मुंब्रा रेतीबंदर परिसरात भरधाव ट्रकच्या धडकेत २ दुचाकीस्वार ठार आणि दोन जण जबर जखमी झाल्याची घटना माहे ऑगस्ट, २०१५ दरम्यान घडली आहे, हे खरेआहे काय,

(२) असल्यास, या भीषण दुर्घटनेची शासनाने चौकशी करुन संबंधित ट्रकचालकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०६-२०१६) :(१) व (२) होय हे खरे आहे.

प्रस्तुत प्रकरणी मुंब्रा पो.स्टे. गु.रजि.नं. ६७७/१५ भा.दं.वि.क्र. ३०४(अ) २७९, ३३७, ३३८, ४२७ सह मो.वा.का.क. १८४ १३४ (१)(२) प्रमाणे दि. ०५.०८.२०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपी ट्रक चालकास अटक करण्यात आली असून सदरचा गुन्हा पोलीस तपासावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात पर्यटनस्थळे विकसीत करण्याबाबत

(१६) ३२५२० (२१-०१-२०१६). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्रत्येक जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांना कोणती पर्यटनस्थळे विकसीत करता येतील याचा अहवाल सादर करण्याच्या सूचना शासनाने माहे सप्टेंबर, २०१५ च्या दुसऱ्या आठवड्यात दिल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सर्व जिल्ह्यात प्रत्येकी पाच याप्रमाणे राज्यात शंभराच्यावर पर्यटनस्थळे विकसीत करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे पर्यटनाच्या दृष्टीने हे राज्य महत्वाचे बनणार असून राज्यातील हजारो बेरोजगारांना काम मिळणार असल्याने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१६) :(१), (२), (३) व (४) दि. ४/११/२०१० च्या शासन निर्णयानुसार जिल्हाधिकाऱ्यांकडून जिल्ह्यांचे पर्यटन बृहत आराखडे तयार करण्यात आले आहेत. सदर आराखड्यांचा महामंडळस्तरावर पुनश्च छाननी करण्याबाबत कळविण्यात आले आहे. आराखड्यांची अंमलबजावणी कामाच्या प्राधान्य क्रमानुसार व निधीच्या उपलब्धतते नुसार करण्यात येणार आहे. यानुसार जिल्हाधिकाऱ्यांना प्राधान्यक्रम सादर करण्याच्या सूचना महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाकडून देण्यात आल्या होत्या.

होट्टल (ता.देगलूर जि.नांदेड) या पर्यटन स्थळाचा विकास करण्याबाबत

(१७) ३३९५९ (२१-०१-२०१६). श्री.सुभाष साबणे (देगलूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) होट्टल (ता.देगलूर जि.नांदेड) या पर्यटन स्थळाचा विकास करण्याच्यादृष्टीने केंद्र शासनाच्या मेगा टुरिझम सर्किट डेव्हलपमेंट या योजनांमध्ये समावेश करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेअंतर्गत या पर्यटन स्थळाचा विकास करण्याकरिता केंद्र व राज्य शासनाने किती निधीची तरतूद केली आहे,
(३) असल्यास, या योजनेअंतर्गत कोणकोणती विकास कामे करण्यात येणार आहे,
(४) अद्यापपर्यंत निधीची तरतूद केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१६) :(१) होय.
(२) व (३) केंद्रीय पर्यटन मंत्रालयाने सिध्देश्वर मंदिर होट्टल येथील रु. ३४४.९४ लक्षच्या विकास कामांना मंजूरी देऊन रु. १७२.४७ लक्ष निधी उपलब्ध करुन दिला आहे. त्यामध्ये पर्यटक सुविधा केंद्र, सुरक्षा कक्ष, तिकिट घर, स्वच्छतागृह संरक्षण भिंत, घनकचरा व्यवस्थापन, विद्युतीकरण इ. कामांचा समावेश आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मनपाडळे (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) येथील मंदिर व परिसराला "क" वर्ग पर्यटनस्थळ दर्जा देण्याच्या मागणीबाबत

(१८) ३४१८५ (२१-१२-२०१६). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजर्षी शाहू महाराजाच्या पदस्पर्श, समर्थांनी स्थापन केलेल्या अशी ऐतिहासिक व धार्मिक पार्श्वभूमी असलेल्या पूणे-बंगरुळ महामार्गाच्या पश्चिमेला आठ कि.मी. अंतरावर असलेल्या मनपाडळे (ता.हातकणंगले,जि.कोल्हापूर) या मंदिरात दररोज राज्यातून हजारोंच्या संख्येने भाविक येत असून या ठिकाणी भाविंकाकरिता पाणी, पार्किंगसह मुलभूत सुविधा नसल्याने भाविंकाची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर स्थळाला "क" वर्ग पर्यटनस्थळ दर्जा देण्याची मागणीही केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्याचे स्वरुप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१६) :(१) होय.
(२) सदर स्थळास "क" वर्ग यात्रास्थळाचा दर्जा देण्यात आलेला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

सिंधुदूर्ग किल्ल्याच्या दर्शनासाठी किल्ले प्रवासी होडी वाहतूक सेवा बंद बसल्याबाबत

(१९) ३४६१६ (२१-०१-२०१६). श्री.वैभव नाईक (कुडाळ) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदूर्ग किल्ल्याच्या दर्शनासाठी किल्ले प्रवासी होडी वाहतूक सेवा नौका सर्वेक्षणाअभावी बंद अवस्थेत असल्याचे नुकतेच माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे पर्यटनासाठी आलेल्या पर्यटकांना बंदर जेटीवरुनच किल्ल्याचे दर्शन घेऊन जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, किल्ले प्रवासी होडी वाहतूक सेवा नौका सर्वेक्षणास विलंब लागण्याची कारणे काय आहेत व याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१६) :(१) नाही.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

वायंगणी-तोंडवली (जि.सिंधुदुर्ग) येथील प्रस्तावित सुधारीत सी-वर्ल्ड प्रकल्प ३०० ते ३५० एकर क्षेत्रात उभारण्याचा घेतलेल्या निर्णयाबाबत

(२०) ३४६५३ (२२-०१-२०१६). श्री.वैभव नाईक (कुडाळ) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वायंगणी-तोंडवली (जि.सिंधुदुर्ग) येथील प्रस्तावित सुधारीत सी-वर्ल्ड प्रकल्प ३०० ते ३५० एकर क्षेत्रात उभारण्याचा निर्णय शासनाने घेतला असून याबाबत मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्र पर्यटन महामंडळाला निर्देश दिले असल्याचे दिनांक ३ ऑगस्ट २०१५ रोजी घेतलेल्या पत्रकार परिषदेत जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांनी स्पष्ट केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पूर्वीचा १३०० एकर जागेवरील सी वर्ल्डचा आराखडा बदलून ३०० एकर क्षेत्रात सी वर्ल्ड प्रकल्प उभारण्याचे नियोजन शासनाने केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पूर्वीच्या सी वर्ल्ड आराखड्यात बदल करुन नव्याने ३०० एकर क्षेत्रात सी वर्ल्ड प्रकल्प राबविताना शासनाने कोणकोणते बदल केले आहे,

(४) सदरहू सुधारित सी वर्ल्ड प्रकल्पाच्या कामात प्रत्यक्षात केव्हा सुरुवात करण्यात येणार आहे व हे काम किती कालावधीत पूर्ण होईल असे अपेक्षीत आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१६) :(१) मा.मुख्यमंत्री यांनी दि. २८/०१/२०१५ रोजी सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटनाबाबत झालेल्या बैठकीत समुद्रविश्व प्रकल्प हा प्रथमत: ३५० ते ४०० एकर जागेमध्ये करण्यात यावा असे निर्देश दिले आहेत.

(२) सुमारे ३५० ते ४०० एकर जागेत करण्याचे नियोजन आहे.
(३) व (४) प्रकल्पासाठी २९३ एकर व इतर मुलभुत सुविधांसाठी १२४ एकर जमिन प्रस्तावित केली आहे. त्यानुसार भुसंपादनाबाबत प्रस्ताव प्राप्त झाला असून तो विचाराधीन आहे.

नेवासा (जि.अहमदनगर) शहराला पर्यटन केंद्राचा दर्जा देण्याबाबत

(२१) ३४६७७ (२१-०१-२०१६). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नेवासा (जि.अहमदनगर) या श्री.संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पदस्पर्शाने पुनित झालेल्या नगरीत वर्षभर लाखो भाविक येत असताना मात्र येथे भाविकांसाठी शासनामार्फत कोणत्याही सोईसुविधा नसल्याने भाविकांना अत्यंत त्रासांना सामोरे जावे लागत असल्याने स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेल्या मागणीनुसार मा.पर्यटन राज्यमंत्री यांनी नेवासा शहराला पर्यटन केंद्राचा दर्जा देण्याबाबतची घोषणा माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१६) :(१) जिल्हा माहिती कार्यालयातील माहे डिसेंबर, २०१४ या कालावधीतील वृत्ताची पडताळणी केली असता, अशा आशयाचे वृत्त आढळून आले नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

रांगणा (ता.भुदरगड, जि.कोल्हापूर) या ऐतिहासिक किल्ल्यावर सुविधा उपलब्ध करण्याबाबत

(२२) ३५३६१ (२१-१२-२०१५). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रांगणा (ता.भुदरगड, जि.कोल्हापूर) या ऐतिहासिक किल्ल्यावर येणाऱ्या पर्यटकांसाठी कोणत्याही सुविधा उपलब्ध नसल्याने पर्यटकांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त किल्याचा पर्यटक विकास आराखडा तयार करण्यासाठी स्वतंत्र निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१६) :(१), (२) व (३) जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्यामार्फत कोल्हापूर जिल्ह्यासाठी पर्यटन बृहत विकास आराखडा तयार करण्यात आला असून सदर आराखड्यात भुदरगड तालुक्यातील रांगणा किल्याच्या विकास कामांचा समावेश आहे. हा आराखडा अंतिम झाल्यानंतर कामांच्या प्राधान्यानुसार व निधीच्या उपलब्धतेनुसार कामे करण्याचे शासनाचे धोरण आहे.

सिन्नर (जि.नाशिक) येथील मंजूर व सद्यस्थितीत प्रगतीपथावर असलेल्या पर्यटन विकास कामांना लागणाऱ्या उर्वरित निधीची मागणी केल्याबाबत

(२३) ३५७५९ (२१-०१-२०१६). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिन्नर (जि.नाशिक) येथील सन २००९-१० ते सन २०१३-१४ या आर्थिक वर्षातील मंजूर व सद्यस्थितीत प्रगतीपथावर असलेल्या पर्यटन विकास कामांना लागणाऱ्या उर्वरित निधीची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २९ जुलै, २०१५ रोजी मा.मुख्यमंत्री यांचेकडे लेखी पत्राद्वारे केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रगतीपथावरील कामे पूर्ण करण्यासाठी आवश्यक असलेला निधी मंजूर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१६) :(१) होय, हे खरे आहे.

(२) सदर निवेदनातील ७ कामांपैकी ५ कामांना सन २०१५-१६ मध्ये रु. ३०९.८३ लक्ष इतका निधी वितरित केला आहे. सहावे काम वडांगळी येथील सतीमाता मंदिर परिसर विकासाबाबत असून यापूर्वी या कामाला मंजूर केलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणापत्र अप्राप्त असल्याने निधी वितरीत करता आला नाही.

सातवे काम गोंदेश्वर येथील पर्यटन विषयक काम असून ते केंद्रीय अर्थसहाय्य योजनेअंतर्गत मंजूर झालेले आहे. केंद्र शासनाने सदर योजना आता बंद केली असल्याने त्याला निधी वितरीत करता आलेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे पेड (ता.तासगांव, जि.सांगली) येथील निसर्गरम्य पर्यटन स्थळाचा विकास करण्याबाबत

(२४) ३५९४३ (२१-०१-२०१६). श्री.अनिल बाबर (खानापूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पेड (ता.तासगांव, जि.सांगली) येथील निसर्गरम्य पर्यटन स्थळाचा विकास निधी अभावी प्रलंबित असल्याने पर्यटकांची गैरसोय होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाकडून पर्यटन स्थळ विकसित करणेसाठी निधी उपलब्ध करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१६) :(१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

कडधे व सातकरस्थळ वसाहत करंजविहीरे (जि.पुणे) शासकीय विश्रामगृह पर्यटन विकास महामंडळाकडे हस्तांतर करून विकसित करण्याबाबत

(२५) ३६७०४ (२१-०१-२०१६). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दुर्गम क्षेत्रात पर्यटकांना रात्री राहता यावे याकरिता उत्तम पर्यटनक्षमता असलेल्या सुंदर ठिकाणी वसलेल्या शासकीय विश्रामगृह महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाकडे हस्तांतर करून विकसित करण्याचा शासन निर्णय- टीडीसी२०११/९/प्र.क्र.६६९/पर्यटन दिनांक २१ ऑक्टोबर २०११ नुसार शासनाने अवलंबिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चासकमान धरणाजवळील कडधे व सातकरस्थळ वसाहत, भामा आसखेड जवळील करंजविहीरे येथील जलसंपदा विभागाचे वापराविना पडून असलेले विश्रामगृह महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाकडे हस्तांतर करून विकसित करणेबाबत मा. व्यवस्थापकीय संचालक, पर्यटन विकास महामंडळ. यांना स्थानिक लोकप्रतिनिधीने दि.२२ सप्टेंबर २०१५ रोजी निवेदन दिले आहे, हे हि खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने सदर विश्रामगृह विकसित करणेबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१६) :(१) होय.

(२) होय.

(३) व (४) प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने महामंडळाच्या प्रादेशिक कार्यालय, पुणे यांचेकडून स्थळपाहणी अहवाल प्राप्त झाला असून महामंडळामार्फत विश्रामगृह हस्तांतरणाबाबत जलसंपदा विभागाकडे पत्रव्यवहार करण्यात येत आहे.

राज्यातील स्वातंत्र्य सैनिक व त्यांचे वारसांचे विविध प्रलंबित प्रश्नांबाबत

(२६) ३९७५३ (२०-०५-२०१६). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील स्वातंत्र्य सैनिक व त्यांचे वारसांचे विविध प्रलंबित प्रश्नांबाबत कोल्हापुर जिल्हा स्वातंत्र्य सैनिक संघटना यांनी मा. मुख्यमंत्री यांना विविध मागण्यांचे निवेदन माहे जानेवारी, २०१६ च्या दुसऱ्या आठवडयात सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्वातंत्र्य सैनिकांची ना मंजुर झालेली पेन्शन प्रकरणे, वारसांचे नोकरीचे प्रश्न व स्वातंत्र्य सैनिकांच्या प्रश्नांबाबत समिती नेमण्याबाबत सदर निवेदनात मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागण्यांबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०६-२०१६) :(१) होय.
(२) होय.
(३) शासन निर्णय क्रमांक ०४.०७.१९९५ नुसार (अ) तुरुंगवास झालेले स्वातंत्र्य सैनिक, (आ) पकड वॉरंट निघाल्यामतुळे फरारी राहिलेले स्वातंत्र्य सैनिक, (इ) भूमिगत स्वातंत्र्य सैनिक आणि (ई) गोवा मुक्ती संग्रामात सहभागी झालेले स्वातंत्र्य सैनिक यांनी निवृततीवेतन मिळण्यासाठी कोणते पुरावे सादर करणे आवश्यक आहे, हे विहित करण्यात आलेले आहे. सदर निकषाची पुर्तता ज्या प्रकरणामध्ये होत नाही, ती प्रकरणे स्वातंत्र्य सैनिक उच्चधिकार समितीने नामंजूर केलेली आहेत.

स्वातंत्र्य सैनिकांच्या नामनिर्देशित पाल्यांना शासकीय सेवेतील गट "क" व "ड" च्या पदावरील नियुक्तीसाठी पसंतीक्रम व वयागेमर्यादेत सवलत दिलेली आहे.

त्यामुळे स्वातंत्र्य सैनिकांच्या प्रश्नाबाबत वेगळी समिती नेमण्याची आवश्यकता नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापुर जिल्हयातील देवस्थान समितीकडे काम करणाऱ्या २५० कर्मचाऱ्यांना दोन महिन्यांपासून पगार देण्यात आला नसल्याबाबत

(२७) ४००४९ (२०-०५-२०१६). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापुर जिल्हयातील महालक्ष्मी आणि जोतिबा मंदिरांसाठी सेवा देणाऱ्या आणि देवस्थान समितीकडे काम करणाऱ्या २५० कर्मचाऱ्यांना दोन महिन्यांपासून पगार दिला नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पगार थकीत राहण्याची कारणे कोणती व पगाराची रक्कम अदा करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०६-२०१६) :(१) होय, हेखरे आहे.
(२) देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र कोल्हापूरचे मुख्य कार्यालय तसेच श्री.करवीर निवासिनी (श्री महालक्ष्मी) कोल्हापूर उपकार्यालय व श्री केदारलिंग देवस्थान (श्री.जोतिबा) वाडी रत्नागिरी ता.पन्हाळा उपकार्यालय सावंतवाडी जि.सिंधुदुर्ग या कार्यालयात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक बाबींचा तपशील संकलित करण्याच्या कामामुळे वेतनदेयक तयार करण्याच्या कामास विलंब झाला आहे.

समितीवरील सर्व कर्मचाऱ्यांना नोव्हेंबर, २०१५ व डिसेंबर, २०१५ चे वेतन अदा करण्यात आले असून जानेवारी २०१६ पासूनचे वेतन वेळच्या वेळी अदा करण्यात आले आहे. तसेच यापुढे कर्मचाऱ्यांचे वेतन वेळेवर अदा करण्याची तजवीज करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

भडगांव (जि.जळगांव) येथे बाळंद रोडला वाळू नेण्यास विरोध केला असता सरपंचांना मारहाण करण्यात आल्याबाबत

(२८) ४०४४९ (२०-०५-२०१६). श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भडगांव (जि.जळगांव) येथे बाळंद रोडला वाळू नेण्यास विरोध केला असता वाळू चोरटयांनी माजी सरपंच रणजित भोसले यांना दिनांक २२ डिसेंबर, २०१५ रोजीच्या सुमारास दंडुक्याने मारहाण करत जखमी केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात स्थानिक पोलिस स्थानकांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी आतापर्यंत किती जणांना अटक केली व त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप याबाबत कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०६-२०१६) :(१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी २३ आरोपींविरुध्द भडगांव पोलीस स्टेशन येथे भाग ५, गु.र.नं. १३४/२०१५ भादंवि कलम ३९५, ३२५, ३२६, १४३, १४७, १४८, १४९, ५०४, ५०६ सह म.पो.का.क. १३५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) सदर प्रकरणी २३ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांचे विरुध्द मा.न्यायालयात दोषारोप पत्र सादर करण्यात आले आहे. सध्य:स्थितीत २२ आरोपी जामिनावर मुक्त आहेत. तसेच, सदर प्रकरणातील १ मुख्य आरोपीस एमपीडीए कायद्यांतर्गत १ वर्ष कालावधीसाठी स्थानबध्द करण्यात आले असून तो सध्या कारागृहात आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्य शासन स्वतःच्या मालकीची विमाने व हेलिकॉप्टर वापरत नसल्याबाबत

(२९) ४०४६९ (१७-०५-२०१६). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.दिपक चव्हाण (फलटण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासन स्वतःच्या मालकीचे असणारे विमान व हेलिकॉप्टरचा वापर न करता खाजगी कंपनीच्या विमान व हेलिकॉप्टरचा वापर करत असल्याने भाड्यापोटी लाखो रुपयांचा खर्च होत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाच्या मालकीची किती विमाने व हेलिकॉप्टर आहेत व त्यापैकी किती विमाने व हेलिकॉप्टर वैमानिका अभावी वा इतर कारणाने वापराविना पडून आहेत,

(३) असल्यास, स्वतःच्या मालकीची विमाने व हेलिकॉप्टर वापरून खाजगी कंपनीला देण्यात येणारे भाडे वाचवण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०६-२०१६) :(१) हे खरे नाही. परंतु शासनाच्या मालकीचे विमान व हेलिकॉप्टर हे परिरक्षण व देखभाल या निमित्त भूमिस्थ असल्यास अथवा एकाचवेळी एकापेक्षा जास्त अतिमहत्वाच्या व्यक्तींकरीता विमान/हेलिकॉप्टरची गरज भासल्यास खाजगी कंपन्यांकडून विमान / हेलिकॉप्टर भाड्याने घेण्यात येते.

(२) राज्य शासनाच्या मालकीची एकूण २ विमाने व २ हेलिकॉप्टर आहेत. वैमानिक अभावी विमान / हेलिकॉप्टर बंद नाहीत. एका हेलिकॉप्टरचा पुर्नवापर करण्याबाबतचा निर्णय नुकताच शासनाने घेतला असून त्या अनुषंगाने दुरुस्तीची कार्यवाही लवकर करण्यात येईल.

(३) व (४) दुसऱ्या एका विमानाच्या पुर्नवापराबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधी आहे.

राज्य शासनाने नवीन पर्यटन धोरणाची घोषणा केल्याबाबत

(३०) ४०७०७ (२०-०५-२०१६). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.नितेश राणे (कणकवली) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याला जागतिक दर्जाचे पर्यटन राज्य म्हणून नावारूपास आणण्यासाठी राज्य शासनाने नवीन पर्यटन धोरणाची सन २०१५ मध्ये घोषणा केली आहे व महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या माध्यमातून सिंधुदुर्ग जिल्हयाचा समावेश पर्यटन जिल्हा म्हणून करण्यात आलेला असून माहे जानेवारी २०१६ पासून धोरणाची अंमलबजावणी करण्याचे निश्चित केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या नवीन पर्यटन धोरणाचे थोडक्यात स्वरूप काय आहे,

३) या नवीन पर्यटन धोरणांतर्गत प्रत्यक्षात किती रक्कमेची गुंतवणूक करण्यात येणार असून या धोरणामुळे किती बेरोजगारांना रोजगाराची संधी उपलब्ध होतील ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१६) :(१) पर्यटन विभागाने नवीन पर्यटन धोरण २०१६ तयार केले असून त्यामध्ये सिंधुदुर्ग, नागपू व औरंगाबाद या जिल्ह्याच्या विशेष पर्यटन जिल्हा म्हणून समावेश करण्यात आलेला आहे. या धोरणाची अंमलबजावणी १ एप्रिल, २०१६ पासून करण्यात येणार आहे.

(२) या धोरणाचे स्वरुप थोडक्यात पुढीलप्रमाणे आहे.

१) दोन राष्ट्रीय महामार्गावर वे साईड सुविधांचे प्रयोगिक तत्वावर काम.

२) एक खिडकी योजना तसेच इव्हेंटसाठी पूर्व मंजूर स्थळे घोषित करणे.

३) प्रस्तावित पर्यटन प्रकल्पांचे मेगा, अल्ट्रामेगा, लार्ज, मिडीयम, स्मॉल आणि मायक्रो असे गुंतवणूक आणि रोजगार निर्मिती विचारात घेवून वर्गीकरण करण्यात येईल व या वर्गीकरणानुसार कालावधी व सवलतीच्या टक्केवारीनुसार नेट व्हॅटचा परतावा, ऐषाराम करात सूट, करमणूक करात सूट, विद्युत शुल्क (ड्यूटी), स्टॅम्प ड्युटी यामध्ये सुट द्यायचे प्रोत्साहन समाविष्ट आहे. MTDC च्या मालकीच्या जागेसाठी N.A. करात सूट देण्याचे प्रस्तावित आहे.

४) दुकाने आणि आस्थापना कायद्याअंतर्गत सर्व लायन्सेसचे दरवर्षी नूतनीकरण करण्याऐवजी दर ५ वर्षांनी नूतनीकरण करण्याचे प्रस्तावित आहे.

५) खालील बाबींसाठी अतिरिक्त प्रोत्साहने प्रस्तावित करण्यात आली आहेत.

* महिला उद्योजकांचे पर्यटन प्रकल्प
* अपंगांचे पर्यटन प्रकल्प
* माहिती / प्रदर्शन केंद्रांचे पर्यटन प्रकल्प
* शाश्वत (sustainable) पर्यटन प्रकल्प

(३) या पर्यटन धोरणाचे सन २०२५ पर्यंत रु.३०,०००/- कोटीची गुंतवणूक आकर्षित करण्याचे उद्दिष्ट असून व १० लक्ष नवीन अतिरिक्त रोजगारांच्या संधी निर्माण होणे अपेक्षित आहे.

नाशिक विमानतळावरून प्रवाशी वाहतूक सेवा सुरु करणेबाबत

(३१) ४०७९४ (२०-०५-२०१६). श्री.छगन भुजबळ (येवला) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथे दिड वर्षांपासून विमानतळाची सुसज्ज इमारत तयार असूनही माहे जानेवारी, २०१५ पर्यंत प्रवाशी सेवा सुरु झालेली नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विमान कंपन्यांची सेवा शुल्क माफीची मागणी शासनाकडे प्रलंबित असल्यामुळे सदर विमान तळावरील विमानांचे उड्डाण प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर विमानतळावरून प्रवाशी वाहतूक सेवा सुरु करण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०६-२०१६) :(१) हे खरे आहे.

(२) सेवा शुल्क माफीबद्दल कोणत्याही विमान कंपनीची विनंती प्राप्त नसल्याचे हिंदुस्थान एअरोनॉटीकल लिमिटेडने कळविले आहे.

(३) व (४) नाशिक येथे विमान सेवा सुरु करण्याबाबत दि. १२.०२.२०१६ व दि.०७.०४.२०१६ च्या पत्रान्वये व्यवस्थापकीय संचालक एअर इंडिया यांना शासन स्तरावरुन विनंती करण्यात आलेली आहे व याबाबत एअर इंडियाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने "डायट" च्या अभ्यासक्रमातून
डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव वगळल्याबाबत

(३२) ४१३२७ (१७-०५-२०१६). ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.संग्राम थोपटे (भोर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे प्राचार्य, ज्येष्ठ अधिव्याख्याता "डायट" मधील पदांसाठी घेण्यात येणाऱ्या घटक चाचणी परिक्षेच्या अभ्यासक्रमातून भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव वगळण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एमपीएससीने प्रकाशित केलेल्या प्रस्तुत अभ्यासक्रमामध्ये बदल करुन थोर शिक्षणतज्ज्ञ व समाजसुधारकांच्या यादी मध्ये विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव समाविष्ट करण्यात येईल काय,
(३) नसल्यास, त्याबाबतची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०६-२०१६) :(१), (२) व (३) प्राचार्य, वरिष्ठ अधिव्याख्याता गट-अ व अधिव्याख्याता गट-ब डायट पदाचा अभ्यासक्रम दिनांक २३.१२.२०१५ रोजी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसध्दि करण्यात आला होता. त्यातील विभाग-१ मधील अ(२) येथील भारतीय व पाश्चिमात्य शिक्षण तज्ज्ञ यांचे विचार व कार्य या भागामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नावाचा समावेश नसल्याचे निदर्शनास येताच आयोगाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाचा समावेश करुन सुधारित अभ्यासक्रम दिनांक २९.१.२०१६ रोजी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे.

राज्यातील बंद असलेल्या विमानतळांना कार्यरत करण्याबाबत

(३३) ४२३६१ (१७-०५-२०१६). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अनिल कदम (निफाड), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील एकूण २५ विमानतळा पैकी फक्त ४ विमानतळच कार्यरत असून राज्यातील प्रमुख शहरांना हवाई वाहतुकीने नियमीत जोडण्याचे शासनाने धोरण तयार केले असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बंद असलेल्या विमानतळांना कार्यरत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०६-२०१६) :(१), (२) व (३) राज्यातील प्रमुख शहरांना हवाई वाहतूकीने नियमीत जोडण्यासाठी केंद्र शासनाच्या धोरणाशी सुसंगत धोरण तयार करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. दरम्यान राज्यातील काही शहरांसाठी विमानसेवा सुरु करण्याबाबत राज्य शासन एअरइंडीयाकडे पाठपुरावा करीत आहे.

राज्यातील धर्मादाय रुग्णालयांमधून गरीब रुग्णांना वैद्यकीय उपचार दिले जात नसल्याबाबत

(३४) ४२४७७ (२०-०५-२०१६). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.राहूल कुल (दौंड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: मुंबई उपनगरात व पुणे तसेच सोलापूर येथील धर्मादाय संस्थेच्या नावाखाली सुरु असलेल्या गरीब व दारिद्रय रेषेखालील व्यक्तीकरीता एकूण खाटांच्या १० टक्के खाटा राखून ठेवून त्यांना मोफत उपचार देणे तसेच खाजगी धर्मादाय रुग्णालयामध्ये या प्रवर्गातील रुग्णांना त्यांचा लाभ दिला जात नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच पुणे विभागातील ६० धर्मादाय रुग्णालयांकडे गरीब व गरजू रुग्णांसाठी वापरण्यात येत असलेला सुमारे ३० कोटी रुपयांचा निधी शिल्लक असल्याबाबत धर्मादाय सहआयुक्तांनी बैठक घेतली असता दिनांक १८ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात एक राज्यस्तरीय नेमलेल्या समितीने अशा धर्मादाय संस्थांची रुग्णालयावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(५) याबाबत शासन खास बाब म्हणून अशा रुग्णालयावर देखरेख ठेवण्यासाठी नविन काही उपाययोजना आखणार आहे काय, असलयास, किती दिवसात आखणार आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०६-२०१६) :(१) नाही.

मुंबईतील धर्मादाय रुग्णालयाकडून माहे जानेवारी, २०१६ मध्ये एकूण १५५७ निर्धन घटकातील रुग्णावर तसेच ५३६ दुर्बल घटकातील रुग्णावर पचार करण्यात आलेले आहेत व पुणे जिल्ह्यातील धर्मादाय रुग्णालयानी माहे जानेवारी, २०१६ मध्ये साधारण ५,७७३ इतक्या निर्धन घटकातील रुग्णावर तसेच ९०१ दुर्बल घटकातील रुग्णावर उपचार केले असून, सोलापूर जिल्ह्यातील धर्मादाय रुग्णालयानी माहे जानेवारी, २०१६ मध्ये ९३ निर्धन घटकातील रुग्णांवर त्याचप्रमाणे ३७ दुर्बल घटकातील रुग्णांवर उपचार केले आहेत.

(२) होय.

(३) व (४) पुणे जिल्ह्यातील धर्मादाय रुग्णालये मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी तयार केलेल्या योजनेतील तरतुदीनुसार पात्र रुग्णावर उपचार करीत असल्याने आय.पी.एफ. मधील रक्कम शिल्लक राहिली म्हणून त्यांच्यावर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) नाही.

धर्मादाय रुग्णालयावर देखरेख ठेवण्यासाठी यापूर्वीच काही समित्या गठीत करण्यात आलेल्या आहेत.

कोल्हापूर येथील नागाळा पार्क परिसरात महाविद्यालयीन तरुणीने आत्महत्या केल्याबाबत

(३५) ४२५९५ (१७-०५-२०१६). डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथील नागाळा पार्क परिसरातील वारणा कॉलनीतील हळदणकर यांच्या बंगल्यातील लेडीज होस्टेल मधील स्मिता खांडेकर या महाविद्यालयीन तरुणीने मैत्रीणीच्या त्रासामुळे गळफास घेऊन आत्महत्या केली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी विद्यार्थीनीला आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०६-२०१६) :(१) हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी ९ आरोपींविरुध्द शाहूपूरी पोलीस ठाणे येथे दि. ०७.०१.२०१६ रोजी भाग ५, गु.र.क्र. ०८/२०१६ भा.दं.वि.सं. कलम ३०६, ३४ प्रमाणे गुन्हा नोंद केला आहे. यातील ४ आरोपी हे विधी संघर्ष बालक असल्याने त्यांना मा.बाल न्यायालय, कोल्हापूर यांनी जामीन मंजुर केल्याने विधीसंघर्ष बालकांना त्यांच्या आईच्या ताब्यात दिले आहे. तसेच, उर्वरित ५ आरोपीपैकी ४ आरोपींना मा.जिल्हा व सत्र न्यायालय, कोल्हापूर यांनी अटक पूर्व जामीन मंजुर केला असून एका आरोपीस मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी अटकपुर्व जामीन मंजुर केला आहे. सद्य:स्थिती मा. न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले असून सदरचा गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर येथे विमानसेवा सुरु करण्याबाबत

(३६) ४३२१८ (१७-०५-२०१६). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर विमान सेवेकरिता वन विभागाच्या जमिनीच्या मोबदल्यात १ कोटी ७५ लाख रुपयांचा निधी देण्याबाबत भारतीय विमान पतन प्राधिकरणाने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निधी देण्यास प्राधिकरणाने नकार दिल्यास शासन उक्त निधीची तरतूद करणार आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०६-२०१६) :(१) हा खर्च माफ करावा असा प्रस्ताव भारतीय विमानपत्तन प्राधिकरणाने शासनास सादर केला आहे.
(२) व (३) मंत्रीमंडळ निर्णयानुसार कोल्हापूर विमानतळ विस्तारीकरणाकरीता आवश्यक वन जमिनीच्या निर्वणीकरणाबाबतची कार्यवाही भारतीय विमानपत्तन प्राधिकरणाने करणे अपेक्षित असल्याचे दिनांक ७.६.२०१६ च्या पत्रान्वये भारतीय विमानपत्तन प्राधिरणास कळविण्यात आले आहे.

पुणे जिल्ह्यातील २१ विधानसभा मतदार संघात झालेल्या विधानसभा निवडणूक कर्मचाऱ्यांचे मानधन अद्याप देण्यात आले नसल्याबाबत

(३७) ४३३८८ (१७-०५-२०१६). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्ह्यातील २१ विधानसभा मतदार संघात माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणूक सात हजार मतदान केंद्रावर विविध कामासाठी सुमारे ४०००० कर्मचारी कार्यरत होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गत दिड वर्षापासून या कर्मचाऱ्यांचे मानधन अद्याप देण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासन स्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१६) :(१) होय.
(२) नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे जिल्ह्यातील सहाय्यक निबंधक भागीदारी संस्था या कार्यालयात भागीदारी संस्थांचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी एक ते दीड वर्षाहून अधिक कालावधी लागत असल्याबाबत

(३८) ४३४०२ (२७-०४-२०१६). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील भागीदारी संस्थांचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी एक ते दीड वर्षांहन अधिक कालावधी लागत असून, सहायक निबंधकाच्या कार्यालयात पुरेसे मनुष्यबळ नसल्याने हा परिणाम होत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०१५ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) पुणे कार्यालयात तीन वर्षांपूर्वी नऊ हजार अर्ज दाखल होऊन आजपर्यंत सुमारे ३ हजार ६१३ प्रकरणे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे शहरात पुणे जिल्ह्यासोबतच, सातारा, सोलापूर, सांगली, कोल्हापूर नगर या सहा जिल्ह्यासाठी एकच कार्यालय असल्याने दाखल होणाऱ्या अर्जांची संख्या जास्त आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ऑन लाईन अर्ज दाखल केल्यानंतर ९० दिवसात हे प्रमाणपत्र देणे बंधनकारक आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, प्रत्येक जिल्ह्यासाठी एक स्वतंत्र सहाय्यक निबंधक कार्यालय स्थापन करणे बाबत शासन स्तरावरुन कुठली कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०६-२०१६) :(१) व (२) होय.

(३) होय. पुणे कार्यालयास सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर व नगर हे जिल्हे जोडले असल्याने व उद्योगधंद्यांच्या वाढीमुळे भागीदार संस्थांच्या नोंदणी अर्जाची संख्या जास्त आहे.

(४) होय. मात्र पुरेसा कर्मचारीवर्ग उपलब्ध नसल्याने ९० दिवासंची मर्यादा पाळता येत नाही.

(५) प्रत्येक जिल्ह्यात स्वतंत्र सहायक निबंधकाचे कार्यालय स्थापन करण्या इतपत अर्ज प्राप्त होत नाही. त्यामुळे असा कुठलाही प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही.

राज्यातील ग्रामीण भागातील तंटामुक्त समितीला मानधन किंवा विशेष सोयी सवलती देण्याबाबत

(३९) ४५१६१ (१७-०५-२०१६). श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण भागातील तंटे सोडविण्याची भुमिका पार पाडणाऱ्या महात्मा गांधी तंटामुक्त समित्यांना वाढणाऱ्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी आणि तंटे सोडविण्यासाठी कागदपत्रे हाताळणे, पोलिस स्टेशन मध्ये जाणे तसेच सदर समित्यांना मानधन किंवा विशेष सोयी सवलती नसल्यामुळे अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तंटामुक्त समितीला मानधन किंवा विशेष सोयी सवलती देण्याबाबत शासन विचार करणार आहे काय,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१६) :(१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्नच उद्भवत नाही.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाव्दारे विदर्भातील निवड झालेल्या विद्यार्थ्यांची टक्केवारी कमी असल्याबाबत

(४०) ४६४०८ (१७-०५-२०१६). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाव्दारे सन २०१० ते २०१३ या चार वर्षात विदर्भातील निवड झालेल्या विद्यार्थ्यांची टक्केवारी राज्यातील इतर विभागांच्या तुलनेत अत्यंत कमी म्हणजेच ९.६८ टक्के इतके असल्याचे माहे, डिसेंबर, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विदर्भातील विद्यार्थ्यांना महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत प्राविण्य मिळविण्यासाठी शासनाकडून विद्यार्थ्यांना पुर्व तयारी करण्यासाठी कोणती उपाययोजना आखण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०६-२०१६) :(१) महाराष्ट्र राज्यसेवा परीक्षेद्वारे गट-अ व गट-ब पदांवर सन २०१०-२०१३ मध्ये विदर्भातील ९.८६ टक्के शिफारशी झाल्या आहेत. तथापि, सदर प्रमाण परीक्षानिहाय व वर्गनिहाय भिन्न असल्याचे खालील आकडेवारीवरुन दिसते.

पद	अमरावती	नागपूर	एकूण
राज्यसेवा (गट-अ व गट-ब)	७.२	२.६६	९.८६
पोलिस उप निरिक्षक	८	४	१२
विक्रीकर निरिक्षक	१०.८१	४.६९	१४.५०
विद्युत सेवा	९.१९	१४.९४	२४.१३
वन सेवा	३.५१	९.६५	१३.१६

याशिवाय लिपिक-टंकलेखक पदांसाठी सन २०११ व २०१३ या वर्षामध्ये निवड झालेल्या टक्केवारी खालीलप्रमाणे आहे :-

सन	अमरावती	नागपूर	एकूण
२०११	१३.५३	३३.०३	४६.५६
२०१३	७.०५	२६.९६	३४.०१

(२) व (३) राज्य शासनातर्फे डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे अंतर्गत विदर्भातील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ तसेच संत गाडगे बाबा विद्यापीठ, अमरावती ह्या विद्यापीठांमध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी (अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती) स्पर्धा परीक्षा पूर्व मार्गदर्शन केंद्र चालविण्यात येतात.

राज्यात सेवा हमी कायदयाची अंमलबजावणी होत नसल्याबाबत

(४१) ४६६९७ (१७-०५-२०१६). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सेवा हमी कायदा लागू करुन सुध्दा सर्वत्र या कायदयाच्या अंमलबजावणीचा बोजवारा उडाल्याचे दिनांक ३० जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या विविध विभागांच्या २६० सेवा निश्चित मुदतीत देण्याची खात्री देणाऱ्या कायद्याची अंमलबजावणीबाबत सरकारने कोणतेही उपक्रम हाती घेतलेले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सेवा हमी कायदयातंर्गत अत्यावश्यक १०० सेवांचा समावेश करुन देखील याचा योग्य तो फायदा सर्वसामान्यांना होत नसून कोल्हापूर जिल्ह्यातील नोंदणी व शुल्क विभागाकडे शेकडो प्रकरण कित्येक दिवस प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, हमी घेतलेल्या विविध सेवा, त्यांची मुदत, सेवा देणारा अधिकारी/कर्मचारी, प्रथम व व्दितीय अपिलीस अधिकारी यांची नावे व पदे इत्यादी माहितीचा तक्ता संबंधित कार्यालयात लावण्याबाबत आणि जनतेमध्ये जागृती करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०६-२०१६) :(१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) नाही.

कोल्हापूर जिल्ह्यात सेवा हमी कायाद्यांतर्गत एकही मुदतबाह्य प्रकरण शिल्लक नाही.

(४) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : आरटीएस २०१६/ प्र.क्र. १०४/१८ (र.व.का.), दिनांक ७ जून, २०१६ अन्वये सर्व विभाग/कार्यालयांना याबाबत सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

वडाळी (जि.अमरावती) वनपरिक्षेत्रात महिला वनमजुराचा विनयभंग करण्यात आल्याबाबत

(४२) ४६९६२ (१६-०५-२०१६). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडाळी (जि.अमरावती) वनपरिक्षेत्रात अनुसूचित जातीच्या एका महिला वनमजुराचा विनयभंग केल्या प्रकरणी वनपरिक्षेत्रधिकारी व वनपाल यांच्या विरोधात फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०६-२०१६) :(१) होय.

(२) दि. ३०.९.२०१५ रोजी फिर्यादी महिलेने दिलेल्या रिपोर्टनुसार पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा, अमरावती येथे अप.नं.४०१/१५ कलम ३५४, ३५४(अ), २९४, ३२३, ३४ भादंवि ३(१)(१०), ३(१)(११) ॲट्रोसीटी ॲक्ट प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आले. तपासामध्ये दोन्ही आरोपी विरुध्द सबळ पुरावा मिळून आला नाही. तसेच वन खात्याचे वरिष्ठ अधिकारी यांनी केलेल्या चौकशीमध्ये काही आढळून आले नाही. दोन्ही आरोपी विरुध्द पुरावा मिळून न आल्याने ब समरी क्र.१/२०१६ करुन मा.न्यायालयात मंजुरीस दाखल करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यभरातून एमपीएससीच्या परिक्षेला बसणा-या विद्यार्थ्यांच्या समस्या सोडविण्याबाबत

(४३) ४७४६१ (२०-०५-२०१६). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात एमपीएसी परिक्षांच्या माध्यमातुन पीएसआय, एसटीआय बरोबरच प्रशासनातील महत्वांच्या पदांकरिता परिक्षा घ्याव्यात, परिक्षेची कमाल मर्यादा ४० वर्षे करावी, यूपीएससीच्या धर्तीवर एमपीएससीचा ही सीसॅट पेपर घेण्यात यावा तसेच यूपीएससीप्रमाणे एमपीएससीनेही प्रतिक्षा यादी जाहीर करावी इ. मागण्यांकरिता लोकप्रतिनिधीनी मा. मुख्यमंत्री यांचेकडे माहे जानेवारी, २०१६ च्या दुस-या आठवड्यात तसेच वारंवार निवेदने सादर केलेली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी केलेल्या मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार पुढे कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे तसेच सदर प्रकरणी राज्यभरातून एमपीएससीच्या परिक्षेला बसणा-या विद्यार्थ्यांच्या समस्या सोडविण्यासंदर्भात आतापर्यंत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०६-२०१६) :(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) प्रस्तुत मागण्यासंदर्भात करण्यात येत असलेली कार्यवाही खालीलप्रमाणे :-

(१) विक्रीकर निरीक्षक पदांसाठीची पूर्व परिक्षा दिनांक १९.६.२०१६ रोजी घेण्यात येत आहे. त्याचप्रमाणे पोलीस निरीक्षक तसेच इतर पदांच्या परीक्षा पदांच्या मागण्यानुसार आयोगाकडून नियोजित वेळापत्रकाप्रमाणे घेण्यात येतात.

(२) संघ लोकसेवा आयोगाच्या धर्तीवर राज्यसेवा पूर्व परिक्षेतील पेपर क्रमांक २ (CSAT) मध्ये बदल करण्याची बाब आयोगाच्या विचाराधीन आहे.

(३) शा.नि.सा.प्र.वि.क्र.एसआरव्ही २०१५/प्र.क्र.४०४/कार्या-१२, दिनांक २५.४.२०१६ अन्वये राज्य शासन सेवा प्रवेशाची कमाल वयोमर्यादा खुल्या प्रवर्गासाठी ३३ वरुन ३८ वर्षे तर मार्गासवर्गीयांसाठी ३८ वरील ४३ वर्षे करण्यात आली आहे.

(४) एक संवर्गीय स्पर्धा परीक्षेकरीता व सरळसेवेच्या पदाकरीता आयोगाकडून प्रतिक्षायादी ठेवली जाते. तथापि, एका पेक्षा अधिक संवर्गाची पदे भरतांना प्रतिक्षासाठी ठेवण्यात येत नाही.

आयोगामार्फत आयोजित सर्व स्पर्धा परिक्षांची एकत्रित सविस्तर गुणवत्ता यादी (merit list) परीक्षेच्या अंतिम निकालानंतर आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत असल्याने उमेदवारास त्याची गुणवत्ता यादीमधील सद्य:स्थिती अवगत होते.

अंबरनाथ (जि.ठाणे) येथील विद्यमान नगरसेवक रमेश (पप्पु) गुंजाळ यांचा मारेकऱ्यांनी केलेल्या हल्ल्यात मृत्यू झाल्याबाबत

(४४) ४७९४३ (२४-०५-२०१६). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (जि.ठाणे) येथील माजी उपनगराध्यक्ष आणि विद्यमान शिवसेना नगरसेवक तसेच जळगांवचे उपजिल्हाप्रमुख रमेश (पप्पु) गुंजाळ यांच्यावर दिनांक २५ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास मोरिवली उद्यानासमोर अनोळखी मारेकऱ्यांनी चॉपरने केलेल्या हल्ल्यात मृत्यू झाल्याची घटना घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१६) :(१) होय, हे खरे आहे.

(२) दि. २५.१२.२०१५ रोजी मोरीवली गावच्या रस्त्यावरील एमएसईबी ऑफिसजवळ १९ लोकांनी एकत्रित येऊन संगनमताने खुन करण्याचा कट केला व तसेच गैरकायद्याची मंडळी जमवून धारदार हत्याराने हल्ला केल्याने श्री.गुंजाळ यांचा मृत्यु झाला. सदर प्रकरणी अंबरनाथ पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.क्र.३३७/१५ भा.दं.वि. कलम ३०७, ३०२, १४३, १४४, १४७, १४८,

१४९, ३४१. भा.ह.का. ४, २५, तसेच, मु.पो.का.क. ३७(१), १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एकुण १९ आरोपीपैकी १२ आरोपींना अटक करण्यात आली असून ७ आरोपींचा शोध सुरु आहे. सदर १२ अटक आरोपींवर म.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून सद्य:स्थितीत १२ अटक आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

मोताळा (जि.बुलडाणा) येथील न्यायालयासाठी नविन इमारत बांधण्याबाबत

(४५) ४८६३१ (२०-०५-२०१६). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मोताळा (जि.बुलडाणा) येथील न्यायालयाचे कामकाज भाडयाच्या जागेत सुरू असून या ठिकाणी तहसिल कार्यालयावर येणारे मोर्चे, सततची वर्दळ व अपुरी जागा, सोई सुविधांचा अभाव, वकीलांसाठी स्वंतत्र्य कक्षाचा अभाव यामुळे अनेक अडचणी येतात, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, उपरोक्त न्यायालयासाठी नविन इमारत बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१६) :(१) होय.
(२) मोताळा, जि.बुलढाणा येथे नवीन न्यायालयीन इमारत बांधण्याकरिता रु. ७,३५,९०,०००/- इतक्या अंदाजित खर्चाचा प्रस्ताव मा.उच्च न्यायालय यांच्या दि. १३ एप्रिल, २०१६ च्या पत्रान्वये प्राप्त झाला असून सदर प्रस्तावास मान्यता देण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे शहरातील कसबा पेठ येथील कचरा वेचणाऱ्या युवकाला पेट्रोल पाजून मारहाण करुन पेटवून दिल्याबाबत

(४६) ४९१२४ (१६-०५-२०१६). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील कसबा पेठ येथील इब्राहिम मेहबूब शेख या इसमाने गाडयांची बॅटरी चोरल्याच्या संशयावरुन कचरा वेचणाऱ्या सावन धर्मा राठोड या युवकाला पेट्रोल पाजून नंतर त्याला जबर मारहाण करुन पेटवून दिल्याचे दिनांक १३ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व यासंदर्भात आरोपींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१६) :(१) हे खरे आहे.

गाड्यांची बॅटरी चोरण्याच्या संशयावरून कचरा वेचणाऱ्या सावध धर्मा राठोड या युवकला पुणे शहरातील कबसा पेठ येथे आरोपींनी पेट्रोल टाकून जीवे माण्याचा प्रयत्न केला.
(२) सदर प्रकरणी फिर्यादीने दिलेल्या फिर्यादीवरुन फरासखाना पोलीसठाणे, पुणे येथे गु.र.नं. ०८/२०१६, भा.दं.वि. कलम ३०७, ३२३, ५०४, २०१, ३४ अन्वये ३ आरोपींना अटक करण्यात आली आहे. उपचारादरम्यान फिर्यादीचा मृत्यू झाल्याने दाखल गुन्ह्यामध्ये भा.दं.वि. कलम ३०२ लावण्यात आले आहे.

गुन्ह्याचा तपासात तीनही आरोपीविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून सदर प्रकरणी न्यायप्रविष्ठ आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

दधम (ता.बाळापूर, जि.अकोला) येथील विद्यार्थ्यांने आत्महत्या केल्याबाबत

(४७) ४९६४५ (१७-०५-२०१६). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दधम (ता.बाळापूर, जि.अकोला) येथील नववीत शिकत असलेल्या विशाल विश्वनाथ खुळे या विद्यार्थ्यांने सततच्या नापिकीमुळे शिक्षणासाठी कुटुंबाकडे पैसे नसल्याने चिंतातूर झाल्याने दिनांक २२ नोव्हेंबर, २०१५ रोजी आत्महत्या केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर कुटुंबियांना कोणत्या प्रकारची आर्थिक मदत देण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०६-२०१६) :(१) हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी बाळापूर पोलीस ठाणे येथे दि. २५.११.२०१५ रोजी अकस्मात मृत्यु क्र.५७/१५ कलम १७४ जा.फौ. प्रमाणे दाखल आहे. सदर प्रकरणाच्या चौकशीत मृतकाच्या घरची परिस्थिती गरीबीची असल्याने व सतत नानिकीमुळे शाळेचा गणवेश न मिळाल्याने विष प्राशन करुन आत्महत्या केल्याचे निष्पन्न झाले आहे. मृतकाच्या वारसांना मा.मुख्यमंत्री सहाय्यता निधी मधुन आर्थिक मदत देण्याचे प्रस्तावीत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

तुळजापूर देवस्थानमध्ये होत असलेल्या जमीनीच्या अपहाराविषयी दोषींवर कारवाई करण्याबाबत

(४८) ४९९५४ (२०-०५-२०१६). श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तुळजापूर देवस्थान समितीच्या मालकीची तुळजापूर तालुक्यातील १५ गावांत ३ हजार ५६८ एकर जमीन पैकी अमृतवाडी येथील २६५ एकर जमिनीचा अवैधरित्या फेरफार करून ती ७७ लोकांच्या नावावर दिनांक २० जुलै, २००८ रोजी वा त्यासुमारास करण्यात आली असल्याचे तत्कालीन जिल्हाधिकारी, डॉ.प्रवीण गेडाम यांनी केलेल्या चौकशीत निष्पन्न झाले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी तत्कालीन मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी चौकशी करण्याचे आदेश दिले असून विधी व न्याय खात्याचे औरंगाबाद विभागाचे सहसचिव गिराडकर यांच्यासमवेत एकूण ५ जणांनी याची पुढील चौकशी करून त्याचा अहवाल विधी व न्याय खात्यामध्ये मंत्रालय, मुंबई येथे पाठवला असता सदर अहवाल विधी व न्याय खात्याने पुढील कारवाई करण्यासाठी महसूल खात्याकडे पाठवला असून पुढे कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत सद्यस्थिती काय आहे तसेच या प्रकरणी हिंदु जनजागृती समितीने हिंदू विधिज्ञ परिषदेच्या माध्यमातून उच्च न्यायालय औरंगाबाद येथील खंडपिठासमोर संबंधितांवर कारवाई होण्यासाठी जनहित याचिका दाखल केली असून सदर याचिकेवर मा.न्यायमूर्ती बोर्डे आणि मा.न्यायमूर्ती चिमा यांच्यासमोर दिनांक २३ नोव्हेंबर, २०१५ रोजी सुनावणी झाली असून उक्त प्रकरणी न्यायालयाने गृह, महसूल, विधी व न्याय विभागाच्या सचिवांना व उस्मानाबाद, जिल्हाधिका-यांना म्हणणे मांडण्यास सांगितले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी न्यायालयात म्हणणे मांडले आहे काय, असल्यास,त्याचे स्वरुप काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०६-२०१६) :(१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

चंद्रपूर महानगरपालिकेकडे हद्दीतील पुतळे आणि स्मारकांची माहिती नसल्याबाबत

(४९) ५०१७९ (०३-०५-२०१६). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर महानगरपालिकेच्या हद्दीत किती पुतळे आणि किती स्मारके आहेत याचा ठोस आकडाच महानगरपालिकेकडे नसल्याची बाब माहे जानेवारी, २०१६ वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शहरात कोठेही पुतळा वा स्मारक उभारतांना महानगरपालिकेची परवानगी आवश्यक आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शहरातील पुतळ्यांची वा स्मारकांची माहिती न ठेवणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०६-२०१६) :(१) होय हे खरे आहे.

तथापि, जानेवारी, २०१६ मध्ये केलेल्या सर्वेक्षणाअंती चंद्रपूर महानगरपालिका हद्दीत आज रोजी एकूण ०१ स्मारक व ०९ पुतळे असून, सदर पुतळे व स्मारक हे सन १९५५ ते १९८७ च्या दरम्यान अस्तित्वात आलेले आहेत.
(२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.स्मारक-३१०२/८८४/प्र.क्र.१२२/२००२/२९ दिनांक ०२ फेब्रुवारी, २००५ नुसार कार्यवाही होणे आवश्यक आहे.
(३) व (४) चंद्रपूर महानगरपालिका सन २०११ मध्ये स्थापन झालेली आहे. उक्त प्रश्न भागात नमूद शासन निर्णयानुसार महापालिका अस्तित्वात आल्यानंतर चंद्रपूर शहरात प्रमुख महत्वाचे पुतळे उभारण्यात आलेले नाहीत.

तथापि, शहरात अस्तित्वातील पुतळ्यांबाबतचे अभिलेख तत्कालीन नगरपालिकेच्या / महानगरपानिकेच्या अभिलेखात आढळून आलेले नाहीत.

असे असले तरी, सदरचे पुतळे ज्या संस्थेच्या अखत्यारित आहेत, त्या संस्थाकडून याबाबतचे अभिलेख घेण्याचे काम महापालिका स्तरावर सुरु आहे, असे आयुक्त चंद्रपूर महानगरपालिका यांनी त्यांच्या अहवालात नमूद केले आहे.

कोल्हापुर विमानतळाच्या धावपट्टीच्या विस्तारीकरणासाठी संपादित करावयाच्या जमीनीबाबत

(५०) ५२९२८ (२०-०५-२०१६). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापुर विमानतळाच्या धावपट्टीच्या विस्तारीकरणासाठी संपादित करावयाच्या जमीनीबाबत संबंधित ग्रामपंचायतीने नाहरकत दाखला न दिल्यामुळे गत दोन वर्षांपासून भूसंपादन प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त विमानसेवा सुरू होण्याकरिता विमानतळाचे विस्तारीकरण करण्यासाठी जमिनीचा नाहरकत दाखला न देण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, आधीच धावपट्टीची दुरूस्ती, विमान कंपन्यांचा नकार यामुळे गत ६ वर्षांपासून कोल्हापुरची विमानसेवा बंद आहे, हे सुध्दा खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर प्रकरणी शासनस्तरावर कोणता निर्णय घेण्यात आला अथवा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१६) :(१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) विमानतळ धावपट्टी च्या पुर्नबांधणीसाठी दि. ३१.१२.२०१० ते दि. १०.०३.२०११ या तीन महिन्याच्या कालावधीसाठी विमानतळाचा वापर बंद करण्यात आला होता. परंतु त्यानंतर दि. ११.०३.२०११ पासून किंगफिशर एअर लाईन्सची नियमित हवाई सेवा सुरु करण्यात आली होती. तथापि किंगफिशर कंपनी बंद झाल्यामुळे सध्या नियमित हवाई सेवा सुरु नाही. परंतु विमानतळ पूर्णत: कार्यान्वित आहे.
(४) कोल्हापूर येथील विमानतळावर विमानसेवा सुरु करण्याबाबत दि. ७ एप्रिल, २०१६ च्या पत्रान्वये व्यवस्थापकीय संचालक, एअर इंडिया यांना विनंती करण्यात आली असून कोल्हापूर येथील विमानतळावर विमानसेवा सुरु करण्याबाबत शासन पाठपुरावा करत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
मुंबई.

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.